## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/१२/२०१७

**१) वॉलटर जातीच्या कोंबडयाची चोरी. :–**

दिनांक २८/१२/२०१६ चे १२.३०ते १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नरेश जगन्नाथ निनावे वय ४१ रा. आंधळगाव यांचे घरासमोरील अंगणात बांधुन ठेवलेला फिर्यादीचा वॉलटर जातीचा लाल रंगाचा कोंबळा त्याचा बासींग तुरा कापलेला वजन अंदाजे ४ किलो कि. ५,५००/रु. चा यातील संशयीत आरोपीने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याचे संशय असल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची–पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. . :–**

दिनांक ३०/१२/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही रोडाने घराकडे जात असता यातील आरोपीने फिर्यादीस पाहुन शिवीगाळ करीत असता फिर्यादीने त्यास हटकले असता लैंगिक शेरबाजी करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,३५४(अ)(१)(४),५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) उपचारादरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक २३/१२/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक गेदंलाल सखराम शिवने वय ६५ वर्ष रा. गोबरवाही हा स्वत:चे टिव्हीएस मोटार सायकल क्र. एमएच ३६ टी ९०१४ ने पवनारखारी वरून गोबरवाही कडे परत येत असतांना काळया गोटया जवळ यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवुन मृतकचे मोटार सायकलला धडक दिल्याने मृतकचे डोक्याला मार लागल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. २४/१२/२०१७ चे ०८.५० वा. मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. अजनी नागपुर शहर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने व अपघात रजीष्टर क्र. ०५/१७ स्टेडा क्र. १५/१७ दि. २३/१२/२०१७ अन्वये सपोनी. सा. यांचे लेखी आदेशा वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.जायले पोलीस स्टेशन गोंबरवाही हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २८/१२/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हीला यातील आरोपीने फिर्यादीचे कायदेशीर ताब्यातुन फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

५) मिनी ट्रकच्या धडकेत तीन गंभिर जखमी तर एकाचा मृत्यु . :–

दिनांक ३०/१२/२०१७ चे ०६.०० यातील आरोपी मिनी ट्रक ४०७ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन निलज भुयार डांबरी रोडने भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन विरुध्द दिशेने येणाऱ्या स्विप्ट डिझायर गाडी क्र. एमएच ३४ एएम ७००१ ला आमोरासमोर धडक मारुन स्विप्ट डिझायर मध्ये बसलेल्या ४ ईसमान पैकी ३ ईसमांना गंभिर जखमी करण्यास व अमोल रमेश तोनबत्तलवार वय ५० वर्ष, रा. सावली जि. चंद्रपुर यांचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी वामन बाबुराव चुदरी वय ३२ वर्ष, रा. भुयार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. ताजने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

६) संगनमत करुन थापड बुक्यांनी मारहान करुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ३०/१२/२०१७ चे १२.५० ते १३.२० वाजता दरम्यान यातील फिर्यादी बिहारीलाल हरीविकास तिवारी वय ४१ वर्ष, रा. दभवरा जि. रिवा म. प्र. ह.मु. शास्त्री वार्ड वरठी हा बाजारात सामान घेण्यास गेला असता यातील अनोळखी आरोपीतांनी विनाकरन थापड बुक्यांनी तसेच गंज, टिफीन ने फिर्यादींचे तोंडावर, ओठावर, ईच्छा पुर्वक दुखापत केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

७) महिलेला शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ३०/१२/२०१७ चे १४.३९ ते २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी जात असतांना आरोपीने फिर्यादीचे मोबाईवर फोन करुन तु कुठे आहेस? मला भेटायचे आहे असे म्हणुन व तुझी अब्रु रस्त्यावर आणीन? असे बोलुन फिर्यादीचे घरी येवुन घरात घुसुन फिर्यादीचा हात पकडुन शिवीगाळ करुन धमकी दिली तिच्यावर हमला केल्याने व जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५२,३५४(ब))(ड)(१),५०६,५०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ३०/१२/२०१७ चे १२.५० ते १३.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा एस वाहन हे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोंकाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. वंजारी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. शेंडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत

९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–

दिनांक ३०/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, वरठी, तुमसर, गोबरवाही व लाखांदुर येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२१ लिटर हातभट्टी दारू+५००किलो सडवा+ साहित्य+ १ मोटार सायकल किंमती ६२,५१०/–रु. व ०३ लिटर ९६० मिली लिटर देशी दारू कि.१३२४/रु. असा एकुण ६३,८३४/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ३०/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– ०९ केसेस व ईतर वाहनांवरती –६६ केसेस करण्यात आलेले आहे.

(एच.एम. रायपुरे)
स.पो.नि. (नियत्रंण कक्ष अधीकारी)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.